पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजना
ता. धारणी जि. अमरावती
योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय
मान्यता प्रदान करणेबाबत.

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: १०२ /विपाविम/काता ७(३)/ (धा.क्र.३१/२००८)/२०२०/पाटीया (सं.) लपायो / प्रथम सुप्रमा / २०२०, दि.- १९/६/२०२०**

**संदर्भ :-**
१. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कांता-७/२४/पाटीया/प्रमा/(३१/२००८), दि. ३०.०१.२००९.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कक्ष २ /(मु.)/ (धा.क्र.१३/२०१९)/८२६/२०१९, दि. ०३.०९.२०१९.
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२१.११.२०१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(१८३/२०१९)/लपा, दि. ६.१२.२०१९
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. २८.०१.२०२० रोजी संपन्न ७७ व्या बैठकीतील ठराव क्र. ७७/४

**प्रस्तावना :**

पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत तापी खोऱ्यातील सातपुडा उपखोऱ्यात असून अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील पाटीया गावाजवळून वाहणा-या स्थानिक नाल्यावर प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पामुळे अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील ३२२ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प सिंचन अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील असून मेळघाट व्याघ्र प्रकल्पा लगत कुपोषीत आदिवासी क्षेत्रा लगत व डोंगराळ भागातील आहे.

पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन २००८-०९ चे दरसुचीवर आधारीत रू. ९५५.७७९ लक्ष (रू. नऊ कोटी, पंचावन्न लक्ष सत्याहत्तर हजार नऊशे फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल, अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजनेचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ०७.०८.२०१९ रोजीच्या १३५ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२१.११.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. २८.०१.२०२० रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७७ व्या बैठकीतील ठराव क्र. ७७/४ नुसार पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या रू. २९९१.०० लक्ष अंदाजित किमंतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या तुलनेत रू. २०३५.०० लक्षने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू लक्ष | मंजूर प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे | ४४१.०० | ४६.१३ % |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | १०२२.०० | १०६.९० % |
| ३ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | २०८.०० | २१.७६ % |
| ४ | अपु-या तरतुदीमुळे वाढ | २१५.०० | २२.४९ % |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | ६८.०० | ७.११ % |
| ६ | अनुषंगिक खर्च वाढ | ८१.०० | ८.४७ % |
| | **एकूण** | **२०३५.००** | **२१२.८७ %** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये अमरावती जिल्ह्यातील पाटीया (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता. धारणी, जि. अमरावती या योजनेच्या एकूण रू. २९९१.०० लक्ष (रू. एकोणतीस कोटी, एक्याण्णव लक्ष फक्त) अंदाजित किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. २८३६.०० लक्ष (रू. अठ्ठावीस कोटी छत्तीस लक्ष फक्त) अंदाजित किंमतीस कामाप्रित्यर्थ व रू. १५५.०० लक्ष (रू. एक कोटी पंचावन्न लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**१. ठळक बाबी —**

**अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** - **३२२ हेक्टर**

**ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** - **२.५७ द.ल.घ.मी. (२५७०.०० स.घ.मी.)**

**क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** - **रू. १,१६,३८१/-(मापदंड रू.१४३०५८ x ९०%=१,२८,७५२/- प्रती स.घ.मी.)**

**ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** - **०.७९ (NPV वगळून, मापदंड १.०० पेक्षा जास्त)**

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (२।२०२०) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.